


Title Code- MAHMAR-51647

दैनिक जनसंचलन
निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!

संपादक : जितेंद्र कायस्थ
Mob- 9822720784
Email- jansanchlan@gmail.com




वर्ष ३ रे अंक : २७० वा रविवार दि. २९ डिसेंबर २०२४ पृष्ठ ८ किंमत ३रुपये

# पटवारी-मंडळ अधिकारी महासंघात महाभ्रष्टाचारी अधिकाऱ्यांना बढ़ती मिळते का ?

## विजय दत्तात्रय टेकाळे यांच्याकडे आता महासंघाचे राज्य अध्यक्षपद आले...

**जनसंचलन/बुलढाणा**

राज्याच्या अत्यंत महत्वाच्या अशा महसूल विभागात काम करणाऱ्या पटवारी आणि मंडळ अधिकाऱ्यांच्या राज्यात विविध विभागात वेगवेगळ्या संघटना कार्यरत आहेत. राज्यभरातील या संघटनांचा एक महाराष्ट्र राज्य तलाठी, पटवारी-मंडळ अधिकारी समन्वय महासंघ आहे. या महासंघावर नुकतीच बुलढाणा महसूल विभागातील महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय दत्तात्रय टेकाळे यांची निवड करण्यात आली आहे. या नियुक्तीने एक महत्वाचा प्रश्न उपस्थित होतो आहे की, तलाठी पटवारी मंडळ अधिकारी महासंघाला बेबंदपणे भ्रष्टाचार करणाऱ्या, चल अचल अवैध संपत्ती जमा करणाऱ्या, अनेकांची लुबाडणूक करणाऱ्या अधिकाऱ्यांचे वावडे नाही काय? किंवा टेकाळेंनी यासाठी महासंघावर दबाव आणला का? किंवा काही अर्थपूर्ण घडामोडी घडल्या का, असे प्रश्न निर्माण होत आहेत. टेकाळेंना संघटनात्मक पातळीवर ही जी काही तथाकथित बढ़ती देण्यात आली आहे, त्याविरोधात आता सातत्याने सिटी न्यूज व दैनिक जनसंचलन आगामी काळात जनजागृती करीतच राहणार आहे.दैनिक जनसंचलन सिटी न्यूज वतीने गेल्या दोन वर्षांपेक्षा अधिक काळापासून सातत्याने महसूल विभागातील सर्वाधिक महाभ्रष्टाचारी मंडळ अधिकारी विजय टेकाळे यांच्या बेबंद भ्रष्टाचाराविरोधात आवाज उठवण्याचे काम केले आहे. दैनिक जनसंचलन व सिटी न्यूजकडे टेकाळेंच्याभ्रष्टाचाराचे,गैरव्यवहारांचे, लोकांच्या लुबाडणुकीचे तसेच फौजदारी कारवाईसंदर्भातील ठोस पुरावे आहेत. टेकाळे यांनी गेल्या २५ वर्षांत महसूल विभागात प्रचंड भ्रष्टाचाराचा चिखल केलेला आहे. त्यांच्या भ्रष्टाचाराचे सगळे किस्से सिटी न्यूज व दैनिक जनसंचलने आपल्या वाचकांसमोर ठेवले आहेत. खरे तर महसूल विभाग हा शासनाचा एक प्रमुख विभाग आहे. जनतेची विविध प्रकारची कामे करणे, सरकारी यंत्रणा राबवण्याचे काम महसूल विभाग करीत असतो. त्यामुळे या विभागाचा कामकाज हा पारदर्शी आणि गतिमान चालण्याची गरज आहे.याच्या अगदी उलट विजय दत्तात्रत टेकाळे यांनी सातत्याने केवळ आणि केवळ भ्रष्टाचारच केला आहे. या सर्व भ्रष्टाचारातून टेकाळे यांनी एकीकडे लोकांची प्रचंड लुबाडणूक आणि अडवणूक केली, तर दुसरीकडे त्यांनी या भ्रष्टाचाराच्या पैशांतून प्रचंड प्रमाणात बेनामी संपत्ती देखील गोळा केली आहे. दैनिक जनसंचलन सिटी न्यूज टेकाळे आणि त्यांच्या जवळच्या नातेवाईकांच्या नावावर असणाऱ्या बेनामी आणि अवैध संपत्तीचा संपूर्ण तपशील आहे. हा सर्व तपशील सिटी न्यूज ने आपल्या वृत्तमालिकेतून प्रकाशित देखील केला आहे. एव्हढेच नव्हे तर टेकाळेंच्या भ्रष्टाचाराचे पुरावे हे लाचलुचपत प्रतिबंधक विभाग तसेच महसूल विभागाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांना दिले आहेत. टेकाळे यांच्यावर फौजदारी स्वरूपाचे गुन्हे दाखल झाले होते. टेकाळे यांनी शासनाच्या सेवाशर्तीचा भंग केलेला आहे. वर्षानुवर्षे अवैधरित्या एकाच कार्यालयात एकाच पदावर ते चिकटून राहिलेले आहेत. टेकाळे यांनी काही प्रकरणांमध्ये तर न्यायालयाच्या आदेशांचादेखील भंग करून न्यायालयाचा अवमान केलेला आहे. एव्हढे सगळे प्रताप केल्यानंतर खरेतर आज टेकाळे यांच्यावर फौजदारी कारवाई करून त्यांना कायदेशीरदृष्ट्या गजाआड करणे अपेक्षित होते. परंतु तसे न होता टेकाळे यांच्यावर कारवाई करण्याची हिम्मत महसूल विभागातील कोणीही दाखवण्यास तयार नाही. अगदी जिल्हाधिकारी, अपर जिल्हाधिकारी, निवासी उपजिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी कोणीही टेकाळेंवर कारवाई करण्यास धजावत नसल्याचे दिसून




येते. यामागे नेमके काय गौडबंगाल आहे, हे मात्र अजूनही जनतेसमोर आलेले नाही. या संपूर्ण स्थितीत आता टेकाळेंची पटवारी, तलाठी, मंडळ अधिकारी महासंघाच्या प्रदेश अध्यक्षपदी निवड करण्यात आली आहे. ही नियुक्ती देण्यापूर्वी महासंघाच्या पदाधिकाऱ्यांना टेकाळेंचे काळे कारनामे माहिती नव्हते का? माहिती असतील तरीही जर नियुक्ती करण्यात आली, तर ही नियुक्ती मिळण्यासाठी टेकाळेंनी महासंघावर काही दबाव आणला का? ही नियुक्ती मिळण्यामागे काही अर्थपूर्ण घडामोडी तर घडल्या नाहीत ना, टेकाळेंच्या नियुक्तीचा प्रकार म्हणजे चोराच्या हाती तिजोरीच्या चाव्या देण्यासारखा आहे. त्यामुळे आगामी काळात दैनिक जनसंचलन सिटी न्यूज पटवारी तलाठी मंडळ अधिकारी महासंघात चालेल्या या अनागोंदीच्या विरोधात आपली लेखणी झिजवण्याचे काम करणार आहे, हे महासंघाने लक्षात ठेवावे.

---

## मेहकर तालुक्यातील जानेफळ केंद्रात सोयाबीन खरेदी बंद !...

**जनसंचलन/मेहकर**

नाफेडअतंर्गत तालुक्यातील ११ केंद्रांत हमीभावाने सोयाबीनची खरेदी करण्यात येत असली तरी गेल्या सहा दिवसांपासून बारदाना नसल्याने जानेफळ येथील केंद्रामधील सोयाबीन खरेदी बंद आहे. त्यामुळे केंद्रात आलेले शेतकरी त्रस्त असून, नंबर येऊन सुद्धा मोजणी न झाल्याने शेतकऱ्यांमध्ये संताप आहे. मेहकर तालुक्यातील जानेफळ येथेही खरेदी केंद्र असून, २ हजार ५०० शेतकऱ्यांनी सोयाबीन विक्रीकरिता नोंदणी केली होती. पणन महासंघातंर्गत खरेदी केंद्र सुरू केलेल्या कंपनीने आतापर्यंत ९५७ शेतकऱ्यांना सोयाबीन खरेदीकरिता मेसेजद्वारे कळविले आहे. आतापर्यंत ५५० शेतकऱ्यांची एकूण १३ हजार ५०० क्विंटल सोयाबीन खरेदी करण्यात आलेली आहे; परंतु खरेदी केंद्रात सोयाबीन विक्रीसाठी शेतकऱ्यांनी आणलेली वाहने. बारदान्याअभावी सोमवार दि. २३ डिसेंबरपासून खरेदी प्रक्रिया अचानकपणे थांबली. त्यामुळे ज्या शेतकऱ्यांचा नंबर येऊनसुद्धा मोजणी होऊ शकली नाही, ते शेतकरी प्रचंड हवालदिल झालेले असून संताप व्यक्त करत आहेत. केंद्रचालकाला शेतकरी बारदाना कधीपर्यंत उपलब्ध होईल अशी विचारणा करत आहे; मात्र त्याचे उत्तर केंद्र चालकाकडे नसल्याने तेही निरुत्तर आहेत. परिणामी येथील केंद्रावर बारदाना उपलब्ध करण्याची ओरड होत आहे. केंद्राच्या परिसरात शेतकऱ्यांची वाहने सोयाबीन खरेदीच्या प्रतीक्षेत उभी आहेत. दुसरीकडे मेहकर



तालुक्यातील ११ केंद्रांवर हमीभावाने गुरुवारपर्यंत ६ हजार ६७७ मेट्रिक टन सोयाबीनची खरेदी करण्यात आली आहे. अद्यापही अनेक शेतकऱ्यांच्या सोयाबीनची खरेदी बाकी आहे.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड
व्यापक जनचळवळीचा प्रहरी!



# ३० डिसेंबरला साखरखेर्डा येथे राज्यस्तरीय पुरस्काराचे वितरण !

## महाराष्ट्रातील विविध क्षेत्रात काम करणाऱ्या दिग्गज व्यक्तींचा होणार सन्मान

जनसंचलन/बुलढाणा

दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दैनिक भारत संग्रामच्यावतीने स्वर्गीय मधुकरराव खंडारे यांच्या प्रथम पुण्यस्मरण निमित्त तसेच सावित्रीबाई फुले यांच्या जयंतीनिमित्त व समाजभूषण अर्जुन गवई यांच्या वाढदिवसानिमित्त विविध क्षेत्रांमध्ये अतुलनीय कामगिरी करणाऱ्या व्यक्तींचा ३० डिसेंबर रोजी राज्यस्तरीय पुरस्कार देऊन सन्मान केला जाणार आहे ,बुलढाणा जिल्हा तसेच बाहेरील जिल्ह्यामध्ये अनेक शैक्षणिक सामाजिक राजकीय अधिकारी असेल कर्मचारी असेल असे अनेक चांगले व्यक्ती काम करत असतात परंतु त्यांची दखल कोणी घेत नाही त्यांच्या कामाला गती मिळावे ऊर्जा मिळावे म्हणून दैनिक भारत संग्रामच्या वतीने त्यांच्या कामाची दखल घेऊन त्यांना पुरस्कार देण्याचे ठरवले आहे सदर कार्यक्रमाला माजी आमदार डॉक्टर राजेंद्र शिंगणे आमदार मनोज कायंदे . स्वाभिमानी शेतकरी संघटना क्रांतिकारी संस्थापक अध्यक्ष रविकांत तुपकर , मेहकर चे आ . सिद्धार्थ खरात भाई कैलास सुखधाने लॉर्ड बुद्ध टीव्ही चॅनल चे गजेंद्र गवई यांची प्रमुख उपस्थिती असणार आहे . तर प्रमुख वक्ते म्हणून उपविभागीय अधिकारी संजय खडसे त्याचबरोबर प्रवीण गीते राहणार आहेत कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी जिल्हा परिषद उपाध्यक्ष रामभाऊ जाधव हे असणार आहे तर कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून अनिकेत सैनिक स्कूलच्या सचिव सौ प्रतिभाताई अर्जुन गवई व साखरखेर्डा सरपंच सुमनताई सुनील जगताप ,हे करणार आहेत ,कार्यक्रमाचे स्वागत अध्यक्ष म्हणून रावसाहेब देशपांडे महाराष्ट्र प्रदेश भाजपा सदस्य तर केंद्रप्रमुख दिलीप खंडारे हे असणार आहे सदर कार्यक्रमाला तहसीलदार अजित दिवटे ललित शेठ अग्रवाल माजी सेवानिवृत्त प्राचार्य रमेश ठोसरे सर साखरखेर्डा ठाणेदार गजानन करेवाड .



जिल्हा वाहतूक नियंत्रक स्वप्निल नाईक अंढेर पोलीस स्टेशनचे ठाणेदार विलास पाटील यांच्यासह अनेक दिग्गज मान्यवर उपस्थित असणार आहेत सदर कार्यक्रम ३० डिसेंबर रोजी अनिकेत सैनिक हायस्कूल शेंदुर्जन रोड येथे असून सकाळी दहा वाजेपासून शाहीर संघपाल गवई व बाल व्याख्यानकार कुमारी प्रांजली प्रशांत जाधव यांचा गायनाचा कार्यक्रम होणार आहे ,सदर कार्यक्रमाला जास्तीत जास्त संख्येने उपस्थित राहण्याचे आवाहन आयोजकाच्या वतीने करण्यात आले आहे .

# देवपूर येथील ग्रामस्थांचे शोले स्टाइल आंदोलन

जनसंचलन/बुलढाणा

तालुक्यातील देवपूर येथे पाणीपुरवठा योजनेचे काम वेगाने करावे, या मागणीसाठी ग्रामस्थांनी दि. २७ डिसेंबर रोजी गावातील जलकुंभावर चढून शोले स्टाईल आंदोलन करीत उपोषण सुरू केले होते; मात्र पाणीपुरवठा विभागाच्या अधिकाऱ्यांनी आश्वासन दिल्यानंतर ग्रामस्थांकडून आंदोलन मागे घेण्यात आले. गावातील ५५ फुट उंचीच्या पाण्याच्या टाकीवर चढत सरपंचपतीसह ग्रामपंचायत सदस्यांनी आंदोलन सुरू केले होते. गत दोन वर्षांपासून गावातील पाणीपुरवठा योजनेचे काम संथ गतीने सुरू आहे. त्यामुळे ग्रामस्थांना पाणीटंचाईचा सामना करावा लागत आहे. त्यामुळे योजनेचे काम वेळेत पूर्ण करण्याच्या मागणीसाठी आंदोलन करण्यात आले. दरम्यान ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे उपविभागीय अभियंता पळसकर यांनी आंदोलकांची भेट घेऊन १५ जानेवारीपर्यंत काम मार्गी लावण्याचे लेखी आश्वासन दिल्याने आंदोलक टाकीवरून खाली उतरले. या आंदोलनात आस्तिक वारे, सुनील नरोटे, रघुनाथ नरोटे, हरिष कांबळे, किरण दुतोंडे, दशरथ नरोटे, भगवान धनवटे यांच्यासह अन्य ग्रामस्थांनी सहभाग घेतला होता.

# क्षुल्लक कारणावरून युवकास मारहाण

जनसंचलन/मेहकर



क्षुल्लक कारणावरुन युवकास मारहाण केल्याची घटना सोनाटी चौफुलीजवळ दि. २६ डिसेंबरच्या रात्री १० वाजता घडली. याप्रकरणी मेहकर पोलिसांत चार आरोपींवर २७ डिसेंबर रोजी गुन्हा दाखला केला. गणेश रामकिसन सुरुशे (रा.उकळी ता. मेहकर) यांनी पोलिसात दिलेल्या तक्रारीनुसार, रात्री घरी जात असताना सोनाटी चौफुलीजवळ आरोपी योगेश आराख याने माझ्यासोबत चाल असे म्हटले. त्याच्यासोबत गेलो असता जनता हायस्कूलच्या परिसरात गेल्यानंतर क्षुल्लक कारणावरुन त्याच्यासह इतर तिघांनी मारहाण केली आहे. लाथाबुक्या, चापटाने मारहाण करून जिवे मारण्याची धमकी दिली, अशा तक्रारीवरुन अभिजीता साळवे, योगेश आराख, सौरव भगत गोपाल सोळंकी (सर्व रा. मेहकर) यांच्यावर गुन्हा दाखल केला आहे.

# वाटाण्याच्या शेंगांची आवक वाढली!

जनसंचलन/ खामगाव

शहरातील बाजारपेठेत वाटाण्याच्या शेंगांची आवक वाढली आहे. यामुळे दरात घसरण झाली असून प्रतिकिलो ५० ते ६० रुपये किलो दराने विक्री होत आहे. गत आठवड्यात वाटाण्याच्या शेंगांची आवक घटली होती. यामुळे मागणीच्या तुलनेत पुरवठा कमी झाल्याने भावात वाढ झाली होती. आता मात्र भाव आटोक्यात आले असल्याने ग्राहकांना दिलासा मिळाला आहे. पालभाज्यांसह इतर भाज्यांचे दरही आता कमी झाले आहेत. यामध्ये आणखी घट होणार असल्याचे व्यापाऱ्यांनी सांगितले.


आपल्या पाल्याच्या शिक्षणासाठी आजच बचत सुरु करा व त्याचे भविष्य सुरक्षित करा

बचत करा रु. ५०० प्रती माह पासून..



| अ.क्र. | गुंतवणुक कालावधी महिने | ५०० | १००० | १५०० | २००० | ३००० | ५००० |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पाल्याच्या वयाच्या १८ वर्षानंतर मिळणारी रक्कम | | | | | |
| १ | १५६ | १०३४१८ | २०६८३६ | ३१०२५४ | ४१३६७२ | ६२०५०७ | १०३४१७९ |
| २ | १४४ | ९५५४४ | १९१०८८ | २८६६३३ | ३८२१७७ | ५७३२६५ | ९५५४४२ |
| ३ | १३२ | ८८२६९ | १७६५३८ | २६४८०६ | ३५३०७५ | ५२९६१३ | ८८२६८८ |
| ४ | १२० | ८१५४४ | १६३०८७ | २४४६३१ | ३२६१७५ | ४८९२६२ | ८१५४३६ |
| ५ | १०८ | ७५३३६ | १५०६७१ | २२६००७ | ३०१३४२ | ४५२०१३ | ७५३३५५ |
| ६ | ९६ | ६५५९६ | १३९१९३ | २०८७८९ | २७८३८६ | ४१७५७९ | ६९५९६५ |

ठेवींवरील आकर्षक व्याजदर

| अ.क्र. | मुदती ठेवीचे विवरण | | लागू व्याजदर | पतसंस्था व इतर संस्था |
|---|---|---|---|---|
| १ | १५ दिवस ते ९० दिवस | | ६.००% | ६.००% |
| २ | ९१ दिवस ते १८० दिवस (वैयक्तीक ठेवी करिता) | | ६.५०% | ५.००% |
| ३ | १८१ दिवस ते १३ महिने | | ६.००% | ६.००% |
| ४ | १४ महिन्याच्या वर २४ महिन्यापर्यंत (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ५ | आवर्त ठेव योजना २४ महिन्याकरिता रू. १५ लाखाचे वर (वैयक्तीक ठेवी करिता) | | ७.००% | ६.००% |
| ६ | मासिक ठेव | | ७.००% | – |
| ७ | बचत ठेव | अ) रू. ३ लाखांपर्यंत | ३.००% | - |
| | | ब) रू. ३ लाखांचे वर | ४.५०% | – |

ज्येष्ठ नागरिक, सैनिक, सैनिकांच्या विधवा पत्नी, दिव्यांग यांना ठेवींच्या व्याजदरावर १/२ टक्का जास्त व्याजदर लागू राहील.

5 लाख पर्यंतच्या ठेवींना DICGC चे संरक्षण कवच प्राप्त आहे



पुन्हा एकदा...
सुकन्या
लक्षाधीश ठेव योजना


गुंतवणुकीचा कालावधी मुलीच्या वयाच्या १० वर्षांपर्यंत

ग्राहकांच्या आग्रहाला मान देऊन बँक पुन्हा सुरू करीत आहे
सुकन्या लक्षाधीश ठेव योजना
जन्मापासून ते वय वर्ष १० पर्यंतच्या मुलींच्या भावी आयुष्यासाठी एकदाच या योजनेत गुंतवणूक करा व मुलीच्या २१ व्या वर्षी लक्षाधीश व्हा.

| वय | गुंतवणूक रक्कम | मिळणारी रक्कम |
|---|---|---|
| जन्माच्या वेळी | १७००० | १०३६०९ |
| १ वर्ष | १८००० | १००६५७ |
| २ वर्ष | १९५०० | १०००५२ |
| ३ वर्ष | २१५०० | १०१२१७ |
| ४ वर्ष | २३५०० | १०१५०९ |
| ५ वर्ष | २५५०० | १०१०६४ |
| ६ वर्ष | २७५०० | १००००३ |
| ७ वर्ष | ३०००० | १०००९७ |
| ८ वर्ष | ३३००० | १०१०२७ |
| ९ वर्ष | ३६००० | १०११२२ |
| १० वर्ष | ३९००० | १००५१५ |

आजच जवळच्या शाखेशी संपर्क करा

दि चिखली अर्बन को-ऑप. बँक लि. चिखली
मुख्यालय : डॉ. शामाप्रसाद मुखर्जी मार्ग, छत्रपती शिवाजी महाराज चौक, चिखली, जि. बुलडाणा
फोन : ०७२६४-२४२०३९, २४२९७९, २४२०३८ टोल फ्रि नंबर : १८००-३१३-२३२४

# सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालय, बुलढाणा मार्फत राष्ट्रीय ग्राहक दिन उत्साहात साजरा

**जनसंचलन/बुलढाणा**

ग्राहकांच्या हितांचे संरक्षण करण्याकरिता भारत सरकारने १९८६ रोजी ग्राहक संरक्षण कायदा लागू केला. त्याअनुषंगाने दरवर्षी २४ डिसेंबर हा दिवस राष्ट्रीय ग्राहक म्हणून मानला जातो. या दिवसाचे औचित्य साधुन स्थानिक सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयाच्या वाणिज्य व विज्ञान विभागाच्या इयत्ता ११ वी व १२ वी च्या विद्यार्थ्यांनी राष्ट्रीय ग्राहक दिन उत्साहात साजरा केला. या दिवशी विद्यार्थ्यांनी बुलढाणा शहरातील ग्राहकांची जनजागृती करण्यासाठी रॅली काढली. जयस्तंभ चौक ते कारंजा चौक या बाजार परिसरात रॅली दरम्यान विद्यार्थ्यांनी, ग्राहकांच्या अधिकारांची जाणिव करुन देण्याकरिता, भारतीय ग्राहकांना मिळालेल्या सहा अधिकारांची माहिती असलेले पत्रके लोकांना व स्थानिक दूकानांतील ग्राहकांना वितरित केले तसेच ग्राहक अधिकारांची माहिती देखील दिली. या रॅली चा समारोप जिल्हाधिकारी कार्यालय, बुलढाणा येथे संपन्न झाला. त्या ठिकाणी श्री. जंगम साहेब (अधिक्षक तथा जिल्हा खनिकर्म अधिकारी), श्री. गजानन पद्मने (विधी अधिकारी) व श्री. रविंद्र लहाने (जिल्हाधिकारी यांचे स्विय सहाय्यक) यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या बुलढाणा अर्बनचे संस्थापक अध्यक्ष श्री. राधेश्यामजी चांडक,




संस्थेच्या अध्यक्षा सौ. कोमल झंवर तसेच संस्थेचे मुख्य कार्यकारी संचालक डॉ. सुकेश झंवर यांनी विद्यार्थ्यांच्या या कार्याचे कौतुक केले. सदर कार्यक्रमाच्या यशस्वीतेकरिता सहकार विद्या मंदिर व कनिष्ठ महाविद्यालयातील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले. या कार्यक्रमाचे बुलढाणा परिसरातील जनतेमार्फत कौतुक केल्या जात आहे.

# मलकापूर पांग्रा पुन्हा कडकडीत बंद

**जनसंचलन/बुलढाणा**

महाराष्ट्रभर चर्चेत असलेले बीड येथील सरपंच संतोष देशमुख यांचे अपहरण व त्यांची अमानुषपणे हत्या केल्याप्रकरणी मास्टरमाईड आरोपींना अटक करून मास्टरमाईंड शोधण्याच्या मागणीसाठी व परभणी येथील डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांच्या पुतळ्यासमोरील संविधानाच्या प्रतिकृतीची विटंबना करण्यात आल्याची घटना घडली होती. तर पोलिसांच्या कस्टडीत असलेल्या कार्यकर्ता सोमनाथ सूर्यवंशी मृत्यू झाल्या प्रकरणी निपक्ष चौकशी करून मुख्य आरोपींना अटक करण्यात यावी अशा मागणीसाठी मलकापुर पांग्रा येथे कडकडीत दुसऱ्यांदा बंद पाळण्यात आला. सकाळपासून हॉटेल ,सलून, किरण दुकान, टपरी धारक, अत्यावश्यक सेवा असलेले दूध डेरी यांनी सुद्धा स्वयंपूर्ण पणे व्यापाऱ्यांनी स्वयंपूर्ण



बंदमध्ये सहभाग घेतला होता . बीड व परभणी येथील घटनेचे पडसाद ठिकठिकाणी उमटत असल्याचे पाहण्यास मिळत आहेत. यावेळी बस स्थानक परिसरात असलेली सर्व दुकाने स्वतः दुकानदाराने बंद ठेवण्यात आली होती या घटनेचे निषेधार्थ प्रचंड घोषणाबाजी करण्यात आली आणि यासंदर्भात सखोल चौकशी करून दोषीवर कडक कार्यवाही करण्याची मागणी करण्यात आली बंद यशस्वी करण्यासाठी याळी गावचे सरपंच पती यादव टाले ,तंटामुक्ती अध्यक्ष महादेव गवई ,ग्रा. सदस्य राजू साळवे व युवा नेते शरद आटोळे, अमोल देशमुख ,कैलास देशमुख ,अंकुश देशमुख गजानन देशमुख ,निलेश काकडे,विजय आटोळे ,अरुण टाले ,सुनील बनसोडे ,पवन साळवे,रूपेश गायकवाड,उद्धव देशमुख,गोपाल देशमुख,राजू देखमुख,रत्नाकर पंखुले,बळीराम उगले,रवी वायाळ,कुलदीप टाले, विलास देशमुख राम गवई आदींनी पुढकार घेतला.

# त्या घोटाळाप्रकरणी सूत्रधारास अटक करा !

**जनसंचलन/ जळगाव जामोद**

तालुक्यामध्ये २२ जुलै २०२३ ला झालेल्या अतिवृष्टीमध्ये नुकसानग्रस्त लाभार्थ्यांना मदत न देता बनावट लाभार्थ्यांच्या खात्यात रक्कम वळती केल्याप्रकरणी तीन आरोपींना अटक केली. मात्र, यातील मुख्य सूत्रधार शोधून त्यास अटक करावी, अशी मागणी उद्धवसेनेचे तालुकाप्रमुख गजानन वाघ यांनी आर्थिक गुन्हे अन्वेषण शाखेकडे शुक्रवारी केली. अतिवृष्टी मदत वाटप अपहार प्रकरण मोठे असून, यात आरोपींची संख्या वाढू शकते. तपास योग्य दिशेने केल्यास मुख्य सूत्रधारसुद्धा पोलिसांच्या ताब्यात येऊ शकतो. यामध्ये जळगाव जामोद तत्कालीन तहसीलदार शितल सोलाट यांच्या डीएससीमधून बनावट लाभार्थ्यांच्या खात्यात पैसे पाठवण्यात आलेले अटक करण्यात आलेल्या आरोपींकडून योग्य दिशेने तपास करून पोलिसांनी यातील मुख्य आरोपी शोधावा, अशी मागणी करण्यात आली आहे. घोटाळ्यामुळे अनेक गरजू आणि नुकसानग्रस्त खरे लाभार्थी मदतीपासून अद्यापही वंचित आहेत. तर बनावट लाभार्थी बनवून त्यांच्या खात्यात पैसे व वळती करणे आणि त्यानंतर संबंधित लाभार्थ्यांकडून ते पैसे हडपण्याचा प्रकार तालुक्यात झाला आहे. नुकसानग्रस्त लाभार्थ्यांचा पैसा अफरातफर केल्याप्रकरणी कठोर कारवाई करण्यात यावी, तसेच मुख्य सूत्रधारास तत्काळ अटक करून कारवाई करावी, अशी मागणी उद्धव सेनेने केली आहे. अन्यथा आंदोलन करण्याचा इशारा निवेदनातून दिला आहे.

# पुन्हई येथील शेतकऱ्याची आत्महत्या

**जनसंचलन/मोताळा**

तालुक्यातील पुन्हई येथील ५० वर्षीय शेतकऱ्याने गळफास घेऊन आत्महत्या केल्याची घटना शुक्रवार, २७ डिसेंबर रोजी सकाळी पाच वाजताच्या सुमारास उघडकीस आली. उकर्डा सुपडा शिंदे असे मृत शेतकऱ्याचे नाव आहे. याप्रकरणी फिर्यादीवरून बोराखेडी पोलिसांत आकस्मिक मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. तुकाराम दगडू शिंदे यांनी बोराखेडी पोलिसांत याप्रकरणी तक्रार दिली. त्यांचे चुलत भाऊ उकर्डा सुपडा शिंदे यांनी त्यांच्या आईच्या नावावर असलेल्या शेतीवर कर्ज काढले होते. ते कर्ज फेडू शकले नाही. त्यामुळे त्यांनी गावशिवारातील शेतात सुबाभळीच्या झाडाला गळफास घेऊन जीवनयात्रा संपविली. पोलिसांनी आकस्मिक मृत्यूची नोंद केली आहे.






# मनमोहन सिंग यांचे मुंबईवर विशेष प्रेम, मेट्रोचे पूर्ण श्रेय त्यांनाच देतो- संजय राऊत





वृत्तसंस्था/मुंबई

देशाचे माजी पंतप्रधान मनमोहन सिंग यांची ९२ व्या वर्षी प्राणज्योत मावळली. दिल्लीच्या एम्स रूग्णालयात त्यांच्यावर उपचार सुरू होते. मनमोहन सिंग यांच्या निधनाची बातमी कळाल्यानंतर अनेकांनी त्यांना श्रद्धांजली वाहिली. संजय राऊत यांनी देखील मनमोहन सिंग यांना श्रद्धांजली वाहिली. राऊत म्हणाले की, नोटबंदीमुळे देशाचा जीडीपी दोन टक्क्याने घसरेल, असा इशारा मनमोहन सिंग यांनी दिला होता. अशाप्रकारचे अनेक मोठे इशारे त्यांनी सरकारला दिली आणि ते खरे देखील ठरले. पुढे संजय राऊत म्हणाले, मनमोहन सिंग हे विकास पुरूष होते. देशाच्या तिजोरीमध्ये फक्त १६ दिवस पुरेल इतकेच महसूल शिल्लक असताना त्यांच्या हातामध्ये देशाचे अर्थखाते देण्यात आले. अनेक नवीन योजना त्यांनी आणल्या. आज जे पंतप्रधान नरेंद्र मोदी हे ८५ कोटी जनतेला गरीबांना फुकट धान्य देत आहेत. कोणीही उपाशी राहणार नाही. प्रत्येकाच्या घरात चूल पेटेल. ही योजना मुळ मनमोहन सिंह यांची आहे. अन्न सुरक्षा कायदा हा मनमोहन सिंग यांनी आणला. रोजगार हमी योजना प्रत्येकाला काम मिळले पाहिजे, हे देखील त्यांची योजना आहे. अशा अनेक योजना त्यांनी देशाच्या जनतेसाठी आणल्या. पुढे राऊत म्हणाले, अत्यंत प्रमाणिक म्हणून त्यांचा बोलबाला होता आणि तो शेवटपर्यंत टिकला. माजी पंतप्रधान असूनही देश त्यांच्या जाण्याने दुःखी आहे. मुंबईवर त्यांचे विशेष प्रेम होते. कारण ते मुंबईमध्ये रिझर्व्ह बँकेचे गव्हर्नर होते. मुंबईमध्ये जी मेट्रो दिसते, त्याचे श्रेय कोणीही घेऊ द्या. त्याचे श्रेय मी फक्त मनमोहन सिंग यांनाच देईल. मेट्रोच पहिल्या फेसच उद्घाटन त्यांच्या हस्ते झाले. मुंबईच्या विकासासाठी त्यांची काही स्वप्ने होती. त्यांनी फार काही गाजावाजा न करता पूर्ण करण्याचा प्रयत्न केला. बाळासाहेब ठाकरे आणि मनमोहन सिंग यांचे अत्यंत चांगले संबंध होते. जातीय धर्माचे द्वेश न करणारा तो नेता होता. त्यांचे जाणे हे अत्यंत दुखदायक असल्याचेही संजय राऊत यांनी म्हटले आहे.

# महाराष्ट्राचा ५८व्या निरंकारी संत समागमाच्या स्वेच्छा सेवांचा शुभारंभ...

## पुण्याच्या धरतीवर होणार संत समागम

जनसंचलन/मलकापूर

महाराष्ट्राच्या ५८व्या वार्षिक निरंकारी संत समागमाचे भव्य आयोजन सतगुरु माता सुदीक्षाजी महाराज आणि आदरणीय निरंकारी राजपिता रमितजी यांच्या पावन छत्रछायेमध्ये दिनांक २४, २५ व २६ जानेवारी, २०२५ रोजी मिलीटरी डेअरी फार्म ग्राउंड, पिंपरी पॉवर हाउस जवळ, शास्त्री नगर, पुणे ४११०१७ (महाराष्ट्र) येथील विशाल मैदानांवर आयोजित केला जात आहे. परमात्म्याची ओळख करुन मानवी जीवन दिव्य गुणांनी युक्त करत अनंताकडे विस्तारित करुन विश्वामध्ये सौहार्द व शांतीसुखाचे वातावरण निर्माण करणे हा या संत समागमाचा मुख्य उद्देश आहे. या भव्यदिव्य आध्यात्मिक आयोजनाची पूर्वतयारी करण्यासाठी स्वेच्छा सेवांचा विधिवत शुभारंभ संत निरंकारी मंडळाच्या प्रचार-प्रसार विभागाचे मेंबर इंचार्ज आदरणीय श्री.मोहन छाब्राजी यांच्या शुभहस्ते बुधवार, दि. २५ डिसेंबर, २०२४ रोजी करण्यात आला. या प्रसंगी संत निरंकारी मंडळाच्या वित्त व लेखा विभागाचे मेंबर इंचार्ज श्री.जोगिंदर मनचंदा, प्रचार प्रसार कॉर्डिनेटर (महाराष्ट्र) डॉ.दर्शन सिंह, समागम समितीचे चेअरमन श्री.शम्भुनाथ तिवारी, समन्वयक श्री.ताराचंद करमचंदानी आणि समागम समितिच्या अन्य सदस्यांसहित समस्त महाराष्ट्रातील सेवादल क्षेत्रीय संचालक उपस्थित होते. हजारो सेवादल स्वयंसेवकांसह महाराष्ट्राच्या वेगवेगळ्या भागातून मोठ्या संख्येने आलेल्या भाविक भक्तगणांनी या समारोहामध्ये भाग घेतला.

स्वेच्छा सेवांच्या उद्घाटन प्रसंगी आपले भाव व्यक्त करताना आदरणीय श्री.मोहन छाब्राजी म्हणाले, की सतगुरुंच्या असीम कृपेने आयोजित होत असलेल्या या संत समागमामध्ये तोच सत्याचा संदेश दिला जाईल जो युगानुयुगे संत-महापुरुषांनी समस्त मानवतेला दिला.

ते पुढे म्हणाले, की संत निरंकारी मिशन मानवता व विश्वबंधुत्वाचे मिशन आहे. परमात्म्याचे ज्ञान प्राप्त केल्याने मानवा-मानवातील अंतर संपून जाते आणि एकमेकांशी प्रेमाचे नाते जोडले जाते. ज्यायोगे वैर, द्वेष, ईर्षा यांसारख्या दुर्भावना दूर होतात. ब्रह्मानुभूतिने आत्मानुभूति प्राप्त करुन मानवी गुणांनी युक्त होऊन धरतीसाठी वरदान बनेल असे जीवन जगणे हे मनुष्य जीवनाचे मुख्य लक्ष्य आहे. उल्लेखनीय आहे, की महाराष्ट्रात वार्षिक निरंकारी संत समागमांची परंपरा फार जुनी आहे. १९६८ मध्ये महाराष्ट्राचा पहिला संत समागम मुंबईतील प्रसिद्ध शिवाजी पार्क मैदानावर आयोजित




करण्यात आला व त्यानंतर सतत ५२ संत समागम मुंबई महानगरातच होत आले. सन २०२० मध्ये ५३वा संत समागम नाशिक मध्ये झाला, ५६वा संत समागम छत्रपती संभाजी नगर येथे तर ५७वा संत समागम नागपुर नगरी येथे आयोजित करण्यात आला. यावर्षी हा ५८वा संत समागम आयोजित करण्याचे सौभाग्य विद्येचे माहेरघर पुणे नगरीला प्राप्त झाले आहे, ज्याचे साक्षी अवघे विश्व होईल.

समालखा येथे आयोजित ७७व्या वार्षिक निरंकारी संत समागमानंतर प्रतिवर्षाप्रमाणे प्रत्येक भक्त महाराष्ट्राच्या ५८व्या वार्षिक निरंकारी संत समागमाची मोठ्या आतुरतेने वाट पाहत आहेत.

हा दिव्य संत समागम सर्वार्थाने यशस्वी व्हावा यासाठी निरंकारी सेवादलाचे स्वयंसेवक आणि मोठ्या संख्येने अन्य निरंकारी भक्तगण मोठ्या तन्मयतेने समागम स्थळावर पूर्वतयारीसाठी आपल्या निष्काम सेवा अर्पण करत आहेत.

# मा.ना.खा. आनंदराव अडसुळ यांचा चर्मकार समाजाच्या वतीने सत्कार

### माजी खासदार तसेच अनुसूचित जाती - जमाती आयोगाचे अध्यक्ष ना. आनंदरावजी अडसुळ यांचे बुलढाणा जिल्ह्याशी आहे ऋणानुबंध.



जनसंचलन/मलकापूर

अनुसूचीत जाती-जमाती आयोग अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) ना. आनंदारा अडसुळ हे बुलढाणा जिल्हाचे माजी खासदार असून त्यांची बुलढाणा जिल्हा च्या नागरिकांशी चांगलीच नाड जुडलेली आहे ते खासदार असताना त्यांनी महत्त्वाचे काम केलेले आहे आता ते जाती जमाती आयोगाचे अध्यक्ष झाल्यानंतर बुलढाणा जिल्ह्यात आले असताना अनेक स्तरावर स्वागत करण्यात आले ते मलकापूर येथे दि. २७/१२/२०२४ आले होते. त्याप्रसंगी त्यांची राज्यमंत्र पदाचा दर्जा मिळाल्यामुळे मलकापूर चर्मकार समाजाच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यान आला. मा. नगरसेवक रविंद्र गव्हाळे व समाजबांधवानी व नागरीकांनी त्यांचा शाल पुष्पगुच्छ देवून सत्कार करण्यात आला. शिवसेना नेते ना. आनंदराव अडसुळ जिल्ह्याचे खासदा राहिले असल्याने त्यांची बुलडाणा जिल्हाची नाळ जुडली आहे. त्यांनी मलकापूर चर्मकार इतर समाजासाठी सभागृहासाठी समाजभवन उभे केले व विकासात्मक कामे केले. त्य मलकापूर येथे आगमन झाले असता त्यांचा सत्कार करण्यात आला. यावेळी मा. नगरसेव रविंद्र गव्हाळे, मलकापूर तहसिलदार श्री. राहुल तायडे साहेब, अरुणभाऊ अग्रवाल मा. नगरसेवक पांडुरंग चिम, उपसरपंच मधुकर गव्हाळे, हरिदास गणबस, वसंत शेकोकार स साहेबराव खराटे, शंकर पड्डे, रोहीदास माळी, अमोल हरसुलकर, सागर पढे, संजय परा किशोर सोनने, दलित नेते दत्ताभाऊ हिवाळे, पारसमलजी झाबक, महेंद्र बुरड, भाऊसा सरदार, फिरोज खान, संदिप फेंगडे, डॉ. सुभाष तलरेजा यांचे सह समाजबांधव व नाग उपस्थित होते.

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
आपल्या परिसरातील घडणाऱ्या घटना व बातम्या ९८२२७२०७८४ किंवा ९१२९५८२९५८ या व्हाट्सअप्प नंबर वर पाठवून आम्हाला सहकार्य करावे

दैनिक जनसंचलन निडर निर्भिड व्यापक जनचळवळीचा प्रहरी!
===== बातम्या तसेच जाहिरातीसाठी संपर्क =====
संपादक - जितेंद्र कायस्थ 9822720784 ऑफिस :- 9129582958